—: जाहिर निविदा :—

जिल्हा न्यायालयाच्या मुख्यालयातील कर्मचाऱ्यांचा, ऑफीसमधील कर्मचाऱ्यांचा संगणक फिरती खुर्च्या व मा. न्यायीक अधिकारी यांच्या चेंबर मधील व डायस वरील खुर्च्या हया नादुरुस्त असून बऱ्याच खुर्च्यांचे पंप, नटफिटींग, सिट फिटींग, स्प्रींग टाकून फिटींग, नवीन सीट टाकणे, रिपेरिंग, वेल्डींग, संपुर्ण फिटींग, उजवा व डावा हात तुटलेली फिटींग, नवीन बेस फिटींग, नवीन चाके व फिटींग, इतर फिटींग व ऑयलिंग करुन दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बरेचशे लोखंडी कपाटांचे लॉक, हॅण्डल, दरवाजे खराब झालेले आहेत. सदर संगणक फिरती अंदाजे ११० खुर्च्या व १२० लोखंडी कपाटे दुरुस्त करणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत दुरुस्ती करणा—यांकडून मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.
२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.
३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.
४. आपल्या वस्तुंचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.
५ सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.
६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.
७. दरपत्रकात एकच पत्ता लिहिलेले दोन दरपत्रके नसावे.
८. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.
९. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.
१०. सदरहु दरपत्रक दिनांक ०३/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.
११. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.
१२. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
१३. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.
१४. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक शुक्रवार दिनांक ०३/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— २५/०९/२०२५

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट